VOLUME - VII, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

# ९. राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणा

प्रा. डॉ. रमेश वि. मोरे
सहा. प्राध्यापक, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड, जि. वाशिम.

## प्रस्तावना

राजश्री शाहू महाराज हे एक संस्थानाधिपती यापेक्षा महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे महान नेते होते, हीच त्यांची खरी ओळख होय, बहुजन समाजावर त्यांनी इतके उपकार करुन ठेवले आहेत की, बहुजन समाजाने त्यांना आपले दैवतच मानले आहे. २ एप्रील १८९४ रोजी राजश्री शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानाची अधिकारसुत्रे आपल्या हाती घेतली. त्यापूर्वी त्यांनी आपल्या संस्थानात दौरा काढुन संस्थानाची राज्यव्यवस्था व प्रजेची स्थिती यांची जातीने पाहणी केली होती. यावेळी आपल्या प्रजेची हलाखीची स्थिती पाहुन आपल्या हाती आलेल्या सत्तेचा वापर प्रजेच्या कल्याणासाठीच करण्याचा त्यांनी मनोमय निश्चय केला आणि तो पुढील काळात प्रत्यक्षातही उतरविला.

कोल्हापुर संस्थानचे अधिपती या नात्याने त्यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली. बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यावर शाहू महाराजांनी विशेष भर दिला. समाज सुधारणेच्या दृष्टीने त्यांनी जनहिताचे अनेक कायदे केले. अस्पृश्य व दुर्बल घटक यांना न्याय मिळवुन देण्याचा प्रयत्न केला. राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्याकडेही त्यांनी विशेष लक्ष पुरविले. तथापी, त्यांचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे महात्मा फुल्यांच्या मृत्युनंतर नेतृत्वहीन बनलेल्या महाराष्ट्रातील बहूजन समाजाला त्यांनी सक्षम नेतृत्व मिळवुन दिले. बहूजन समाजाला त्यांचे न्याय हक्क मिळवुन देण्यासाठी राजश्री शाहूंनी प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुध्द संघर्ष केला आणि त्यायोगे बहुजन समाजाची अस्मिता जागृत केली.

## शैक्षणिक कार्य

राजश्री शाहू महाराजांच्या काळात बहूजन समाज शिक्षणापासुन वंचित राहीला होता. शिक्षण ही फक्त वरिष्ठ वर्गाचीच मक्तेदारी बनली होती. बहूजनांच्या मागासलेपणाचे कारण हे त्यांच्यातील शिक्षणाचा अभाव होय, ही गोष्ट शाहू महाराजांनी ओळखली. म्हणून बहूजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवुन आणण्याच्या कार्याला त्यांनी अग्रक्रम दिला.

## वसतिगृहांची स्थापना

शिक्षणात मागासलेल्या खेड्यापाड्यातील मुलांच्यासाठी वसतिगृहाची आवश्यकता आहे. ही गोष्ट शाहू महाराजांच्या लक्षात आली. कारण त्या काळात शिक्षणाच्या सोई फक्त शहरातच उपलब्ध होत्या. ग्रामीण भागातील सर्व सामान्य लोक अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होते. सहाजिकच, आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविण्याची कुवत त्यांच्याकडे नव्हती. म्हणुन शाहू महाराजांनी कोल्हापुरात वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १८ एप्रील १९०१ रोजी मराठा विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग हाऊस' ची स्थापना करण्यात आली. त्यानंतर लवकरच लिंगायत, सारस्वत, पांचालजैन, मुसलमान, नामदेवशिंपी, देवज्ञ, वैश्य,

ढोर–चांभार, सुतार, नाभिक इत्यादी जातींच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरु करण्यात आली. प्रत्येक वसतिगृहास इमारती, खुल्या जागा, कायम स्वरुपी उत्पन्नाची साधने उपलब्ध करुन गरीब विद्यार्थ्यांच्या योगक्षेमाची व्यवस्था केली.

**विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या**

बहूजन समाजातील गरजू व होतकरु विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या देऊन त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण राजश्रीशाहूंनी ठेवले होते. २० मे १९११ रोजी त्यांनी एक जाहीरनामा काढुन १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा केली. ही सवलत प्रथम गरीब विद्यार्थ्यांना देऊन नंतर राहील्यास इतर विद्यार्थ्यांना द्यावी, असा आदेशही त्यांनी काढला.

**सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण**

राजश्री शाहू महाराजांनी शिक्षणक्षेत्रात उचललेले आणखी एक क्रांतिकारक पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात राबविलेली सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना होय. ८ सप्टेंबर १९१७ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधीचा आदेश जारी केला. त्या संदर्भात आपले विचार व्यक्त करतांना म्हटले होते की, "शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगते. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, म्हणुन सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे." ३० सप्टेंबर १९१७ पासुन ही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना करवीर संस्थानात लागूझाली.

**अस्पृश्य उद्धाराचे कार्य**

दलित व मागासलेल्या वर्गाचा उध्दार करणे हे शाहू महाराजांनी आपले जिवीतकार्य मानले होते. सहाजिकच, अस्पृश्यांवरील अन्यायाचे निवारण करण्यासाठीही ते सतत प्रयत्नशील राहीले. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणुन १९०७ मध्ये शाहू महाजारांनी कोल्हापूरात 'मिस क्लार्क बोर्डिंग' या नावाचे एक वसतिगृह उभारले.

**अस्पृश्य समाजाच्या शिक्षणासाठी खास आदेश**

१९०६ चा आदेश सांगतो की, त्यावेळी कोल्हापुरात चांभार, महाराज वगैरे अस्पृश्य लोकांसाठी 'रात्रीची शाळा' होती. २८ नोव्हेंबर १९०६ च्या आदेशाने महाराजांनी ती शाळा कायम केली. ४ ऑक्टोबर १९०७ च्या एका आदेशान्वये कोल्हापुरातील चांभार व ढोर या अस्पृश्य समाजातील 'मुलींच्या शाळेसाठी' मंजुरी देण्यात आली. तसेच त्या शाळेसाठी दरसाल रु. ९६ खर्चाची तरतूदही संस्थांनच्या स्त्री शिक्षणाच्या अंदाज पत्रकांत करण्यात आली.

सर्वात महत्वाचा आदेश २४ नाव्हेंबर १९११ रोजी काढला गेला. त्या अन्वये संस्थानातील सर्व अस्पृश्य वर्गास, सर्व प्रकारचे शिक्षण मोफत करण्यात आले या शिवाय अस्पृश्यातील हुशार विद्यार्थ्यांना, दरबाराकडून वेळोवेळी खास शिष्यवृत्या दिल्या जाऊ लागल्या. महाराजांनी केवळ आपल्याच संस्थानातील अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी काळजी वाहीली असे नाही. तर संस्थानाबाहेर नाशिक, नागपुर इत्यादी ठिकाणांच्या अस्पृश्यांच्या अनेक वसतिगृहांना त्यांनी उदारपणे अर्थसहाय्य केल्याची उदाहरणे सापडतात.

आपल्या राज्यात अस्पृश्यता पाळली जाऊ नये याकडेही शाहु महाराजांनी लक्ष दिले. अस्पृश्यांना शाळा, दवाखाने, पानवठे, सार्वजनिक विहीरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी समानतेने वागवावे, असे आदेश त्यांनी काढले होते. जे सरकारी अधिकारी किंवा नोकर या आदेशांचे पालन करणार नाही त्यांच्या विरुध्द कडक कार्यवाही करण्याचा ईशाराही त्यांनी दिला होता.

**व्यवसाय निवडीचे स्वातत्र्यं**

अस्पृश्यांच्या समस्येची सोडवणुक करण्यासाठी अस्पृश्यांना प्रथम आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे राहता येईल, अशी परीस्थिती निर्माण केली पाहीजे, याची महाराजांना जाणीव होती. म्हणुन त्यांनी अस्पृश्यांना स्वतंत्र्य व्यवसाय सुरु करण्यास प्रोत्साहन दिले. त्यासाठी अस्पृश्य जातीच्या लोकांना उपहारगृहे, दुकाने चालविण्याकरीता त्यांनी आर्थिक सहाय्य केले. अस्पृश्यांना मानाने जगता यावे म्हणुन शाहू महाराजांनी त्यांना नोकऱ्या मिळवुन दिल्या. जातीव्यवस्थेने अस्पृश्यावर व्यवसाया संबंधीचे जे निर्बंध घातले होते ते निर्बंध दुर करुन अस्पृश्यांना सर्व प्रकारचे व्यवसाय करण्याचे स्वतंत्र्य राजश्री शाहू महाराजांनी दिले.

**महार वतने खालसा केली**

महारांची वेठबिगारी माहाराजांनी दुर केली. तरी महार वतनाबरोबर येणारी, वतनाची सरकार दरबारची म्हणुन जी कामे होती, ती वतनदार म्हणुन महारांना करावीच लागणार होते. त्यासाठी त्यांच्याकडे असलेल्या वतनी जमीनीच्या हक्कावरच महार स्वतःला 'वतनदार' म्हणुन घेत होते. पण वतन म्हणुन एक प्रकारची गुलामगिरीच होती. ही गुलागिरी नष्ट करण्याचा एकमेव उपाय म्हणजे सर्वच महारांचे 'महारकीचे वतन' खालसा करुन त्यांच्या जमिनी रयतावा करुन, त्यांच्या नावे करुन देणे, शाहु महाराजांनी त्या उद्देशाने १८ सप्टेंबर १९१८ रोजी आपल्या राज्यातील महारवतने खालसा केली आणि त्या जमिनी अस्पृश्यांच्या नावावर रयतवारीने करुन दिल्या. या व्यतिरिक्त महाराजांनी अस्पृश्यांसोबत सहभोजने आयोजित केली. तसेच अस्पृश्य परिषदा भरवुन त्यात सहभाग घेतला.

**समाज सुधारणेच्या क्षेत्रातील कार्य**

अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यासोबतच अन्यप्रकारच्या सामाजिक सुधारणांना चालना देण्याचे कार्यही शाहू महाराजांनी केले होते. समाजसुधारणेच्या बाबतीत त्यांचा दृष्टीकोन अत्यंत पुरोगामी होता. जातीभेदाला त्यांचा तीव्र विरोध होता. जातिभेद नष्ट झाल्याखेरीज आपल्या समाजाची उन्नती होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते, म्हणुन जातीभेद दुर करण्यासाठीही त्यांनी प्रयत्न चालविले होते.

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रीशिक्षणास प्रोत्साहन तर दिलेच, शिवाय तिच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदेही अमलात आणून तिची समाजाकडुन आणि कुटुंबाकडुन होणारी पिळवणूक थांबविण्याचे अनेक प्रयत्न केले.

**विधवा-पुनर्विवाहाचा कायदा**

मागासलेल्या समाजातील अनेक जातींमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते. तथापि, स्वतःला उच्चवर्णीय व सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जातींमध्ये मात्र विधवांना पुनर्विवाह तर करता येत नव्हता शिवाय त्यांना केशवपनसारख्या अत्यंत क्रुर अशा रुढीखाली अत्यंत दुःखी व उपेक्षित जीवन जगावे लागत होते.शाहू महाराजांनी या

अन्यायी रुढीस धक्का द्यायचे ठरविले. १९१७ च्या जुलैमध्ये त्यांनी आपल्या संस्थानास विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत ज्या अनेक अडचणी निर्माण होत होत्या, त्या या कायद्यान्वये दुर करण्यात आल्या. तसेच या कायद्यानुसार विवाहाची कायदेशीर नोंद करण्याची पध्दती सुरु केली गेली.

**पडदा पध्दतीचा निषेध**

गेल्या शतकात महाराष्ट्रातील उच्चवर्णीयात, विशेषतः राजघराणी, मराठा सरदार व वतनदार घराणी यांच्यामध्ये पडदा पध्दती सर्वत्र रुढ होती. ही पध्दत स्त्रियांच्या मधील स्वामाविक गुणांचा उत्कर्ष दडपणारी रुढी आहे. पडद्यामुळे स्त्रियांमधील शूरतादी गुणांचा सर्वथा नाशा होतो, असे शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते.

**आंतरजातीय विवाह कायदा**

१२ जुलै १९१९ रोजी हा कायदा कोल्हापुर गॅझेटमध्ये प्रसिध्द झाला. त्या अन्वये संस्थानातील हिंदु व जैन या दोन मुख्य धर्माच्या लोकांना "जातिनिर्बंध न पाळता सदरहु दोहोपैकी आपआपल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा" दिली गेली. या कायद्याच्या एका कलमान्वये, विवाहकाली पुरुषाचे वय १८ वर्षे पूर्ण व स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण असले पाहीजे, असा निर्बंध घातला गेला.

**क्रुरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा**

अनेक कुटुंबात स्त्रीयांवर नवरा व त्यांचे नातलग यांच्याकडुन नानाप्रकारचे छळ होत असत. काही छळ असे असत की, अपराध्यास 'इंडियन पिनल कोड' सुध्दा काही शिक्षा करु शकत नसे. त्याला प्रतिबंध करण्याचे शाहू महाराजांनी मनात आणले आणि स्त्रीयांवरील कोणताही छळ न्यायदेवतेच्या नजरेतुन सुटणार नाही, अशा प्रकारचा सर्वसमावेशक कायदा त्यांनी २ ऑगस्ट१९१९ रोजी आपल्या संस्थानच्या गॅझेटमध्ये प्रसिध्द केला.

**घटस्फोटाचा व वारसाचा कायदा**

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात घटस्फोटासंबंधीचा कायदा याच सुमारास आणला. त्यामध्ये स्त्रीच्या हक्काचे संरक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर तिच्या अन्नवस्त्रांच्या खर्चाची योग्य ती व्यवस्था कशी केली जाईल. याकडे लक्ष देऊन कायद्याची तशी कलमे तयार केली होती. तसेच वैवाहीक संतती असेल, तर त्यांच्या ताब्याबद्दलची, पोटगीबद्दलची व शिक्षणाबद्दलची व्यवस्था ही या कायद्याने लावल्या गेली.

जानेवारी १९२० वारसाहक्काच्या कायद्यात महत्वाच्या दुरुस्त्या केल्या गेल्या. या दुरुस्त कायद्यानुसार शुद्राची अनौरस संतती व ब्राम्हण, क्षेत्रीय व वैश्य या तीन वरिष्ठ वर्णाची अनौरस संतती यांना मिळणाऱ्या वारसाहक्कातील फरक काढुन टाकला गेला. सर्व वर्णांच्या अनौरस संततींना, जनक बापाच्या मिळकतीत वारसाहक्क दिला गेला.

**देवदासी प्रथेस प्रतिबंध**

देवाच्या नावावर म्हणुन मुली सोडण्याच्या रुढीतुन देवदासी वर्ग निर्माण होत असे. या देवदासींमध्ये जोगतीन, मुरळी, भावीन असे अनेक प्रकार असत. हा एक प्रकारे पतित स्त्रियांचा दुदैवी वर्ग होता. अस्पृश्याप्रमाणेच देवीदासी प्रथा हा हिंदु समाजावरील कलंक होता. शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२०ला एक खास कायदा करुन तो कलंक दुर केला.

**मागासवर्गीयांसाठी राखीव जागा**

२६ जुलै १९०२ रोजी 'करवीर गॅझेट' मध्ये एक जाहीरनामा प्रसिध्द करुन छत्रपती शाहुंनी एक क्रांतिकारक व अभुतपुर्व निर्णय घेतला. या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन सरकारी खात्यात रिक्त होणाऱ्या जागांपैकी ५०टक्के जागांवर मागासवर्गीय सुशिक्षीत तरुणांची भरती करण्यात येईल असे त्यांनी जाहीर केले. ज्या सरकारी कार्यालयात मागासवर्गीयांची संख्या ५० टक्यांयापेक्षा कमी आहे. तेथे यापुढे मागासवर्गीयांची भरती करावी, असा आदेश त्यांनी दिला. ब्राम्हण, शेणवी, प्रभू व पारशी या पुढारलेल्या जातींव्यतिरिक्त इतर सर्व जातींच्या समावेश या आदेशान्वये मागासवर्गीयांमध्ये दिला गेला होता.

**कुलकर्णी वतने खालसा करुन तलाठ्यांच्या नेमणूका**

राजश्री शाहू महाराजांनी संस्थानातील कुलकर्णी वेतने खालसा करुन, कुलकर्णी ऐवजी ब्रिटिश मुलखातील पध्दतीप्रमाणे 'पगारी तलाठी' नेमण्याची पध्दती स्विकारली होती. या तलाठ्यांच्या जागांवर मागासलेल्या वर्गातील, विशेषतः अस्पृश्य वर्गातील लोकांची वर्णी लागावी, यासाठी 'तलाठी वर्ग' सुरु करुन त्यात अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्यां देऊन प्रशिक्षीत केले गेले. अशा प्रशिक्षीत अस्पृश्यांना अग्रक्रमाने तलाठी म्हणुन नेमले जावे यासाठी महाराजांनी ५ ऑगस्ट १९१८ रोजी खास हुकूम जारी केला.

**महात्मा फुले यांचा वारसा**

सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार राजश्री शाहू हेच होत. त्यांच्याच प्रेरणेने ११ जानेवारी १९११ रोजी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली गेली. या कार्यालयात पुढाकार घेतलेल्या कार्यकर्त्यांना शाहू महाराजांनी पाठिंबा देऊन वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच आर्थिक मदतही मिळवुन दिली. त्यामुळेच या चळवळीचा महाराष्ट्राच्या विविध भागात वेगाने प्रसार झाला.

**सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व**

राजश्री शाहू महाराज यांची सर्वात महत्वाची कामगिरी अशी की, महात्मा फुले याच्यानंतर निष्प्राण होत चाललेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी संजीवनी देऊन तिच्यात नवचौतन्य निर्माण केले य त्यामुळे येथील बहुजन समाजाची अस्मिता जागृत झाली. त्यातूनच पूढे ब्राम्हणेतर चळवळीचा उगम झाला. या चळवळीला शाहू महाराजांच्या रुपाने खंबीर व प्रभावशाली नेतृत्व लाभले.

**ब्राम्हणेत्तर चळवळ**

सत्यशोधक चळवळीचे थोड्याच दिवसांत ब्राम्हणेतर चळवळीत रुपांतर झाले. या चळवळीला 'ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर' वादाची, पार्श्वभूमी लाभली होती. महाराष्ट्रात या वादाला चालना मिळण्यास प्रामुख्याने ब्राम्हण व पुरोहितवर्गाची अहंकारी वृत्तीच कारणीभूत झाली होती.

शाहू महाराजांच्या जीवनात उद्भवलेल्या वेदोक्त प्रकरणाच्या मुळाशीहीच अहंकारी वृत्ती होती. महाराजांच्या पदरी असलेल्या एका पुरोहिताने त्यांना उर्मटपणे म्हटले होते. "आपण क्षत्रीय नसल्यामुळे आपणासाठी वैदिक मंत्र म्हणण्याची गरज नाही. शुद्रांनी पुराणोक्त पध्दतीने अनुग्रह करावयाचा असतो. माझ्या दृष्टीने तुमची किंमत शुद्रापेक्षा अधिक नाही." एक सामान्य भिक्षुक प्रत्यक्ष राजाशी इतक्या बेमुर्वतखोरपणेने वागतो, तर सर्व सामान्य लोकांशी या

वर्गाचे वर्तन कसे असेल, असा विचार राजर्षी शाहुंनी केला. त्याचवेळी भिक्षुकशाहीशी संघर्ष करण्याचा त्यांचा निर्धार पक्का झाला. याची परिणती ब्राम्हणेत्तर चळवळीच्या प्रसारात झाली.

पुरोहीत पध्दती बंद करण्याच्या उद्देशाने ६ जुलै १९२० रोजी शाहूंनी 'शिवाजी क्षत्रीय वैदिक पाठशाळा' सुरु केली. शाहुंच्या राजवाड्यातील धार्मिक विधींबरोबरच राजवाड्यातील विवाहही वैदिक पध्दतीने लावण्याचे कार्य या पाठशाळेतील विद्यार्थी करीत.

राजश्री शाहू महाराजांनी ब्राम्हणेत्तर चळवळीत प्रथमपासूनच सक्रीय सहभाग घेतला होता. बहुजन समाजाला संघटित करुन त्याला त्याचे न्याय हक्क मिळवुन देणे, हा त्या पाठीमागचा त्यांचा प्रमुख उद्देश होता. सन १९१६ मध्ये बहूजन समाजाला राजकीय हक्क मिळवुन देण्यासाठी त्यांनी निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या प्रेरणेने बहूजन समाजातील असंख्य कार्यकर्ते ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी पूढे आले.

या चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे यापूढील काळात महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात बहूजन समाजाला महत्वपूर्ण स्थान प्राप्त होऊ शकले. याचे श्रेय अर्थातच राजश्री शाहू महाराजांकडेच जाते.

**स्मारोप**

सर्व प्रकारचे राजवैभव हाताशी असतांना त्याकडे पाठ फिरवून राजश्री शाहूंनी बहूजन समाजाच्या हिताचा ध्यास घेतला होता आणि त्यासाठी कोणताही त्याग करण्याची तयारी त्यांनी ठेवली होती. हा राजा शेतकऱ्यांमध्ये, कष्टकऱ्यांमध्ये, कामगारांमध्ये, दलित–पतितांमध्ये रमत असे. म्हणुनच राजश्री शाहू महाराज एक लोकराजा होते.

**संदर्भ ग्रंथ सुची**


| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ.पवार जयसिंगराव | – | राजश्री शाहू छत्रपती – जीवन व कार्य<br>अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर–२०१६ |
| २) | किर धनंजय | – | राजश्री शाहू छत्रपती, एक समाज क्रांतिकारी राजा<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई–१९८८ |
| ३) | पाटील श्यामराव (संपा) | – | राजश्री शाहू छत्रपतींचे निवडक आदेश<br>(संकलन अ.प्र.जामखेडकर भाग–२ मुंबई–१९८९) |
| ४) | ॲड गोविंद पानसरे | – | राजश्री शाहू , वसा आणि वारसा<br>राजण बावडेकर, लोकवाङ्मय गृह,मुंबई–२०१५ |
| ५) | साळुंखे पि.बी. | – | राजश्री शाहू , गौरव ग्रंथ, मुंबई–१९७६ |
| ६) | के.सागर | – | महाराष्ट्रातील समाजसुधारक<br>के.सागर प्रकाशन, पुणे–२००५ |
| ७) | डॉ.कोंडेकर आर.एस. | – | रयतेचा राजा राजश्री शाहू महाराज<br>अरुणा प्रकाशन लातूर, २०११ |




IQAC
Co-ordinator
Late Pushpadevi Patil Arts & Science College, Risod Dist.Washim-444506

Late Pushpadevi Patil Art's & Sci College 722 Dist-Washim Risod

Principal
Late Pushpadevi Patil Arts & Science College Risod Dist-Washim